International Journal of Researches in Social Science and Information Studies (IJRSSIS)
September 2014 Issue-III, Volume-II
Online Journal ISSN No. 2347-8268

# स्वॉट विश्लेषण पध्दतीद्वारे ग्रंथालय व्यवस्थापनात व्यूहात्मक नियोजन

**मिलिंद अण्णा मेढे**
अभिलेख अधिकारी
(मध्ययुरेशिया अभ्यास केंद्र, मुंबई विद्यापीठ)

## सार

ग्रंथालयाचे व्यवस्थापन हे सामाजिक उदिद्ष्ट डोळयांसमोर ठेवून करावे लागते, त्यासाठी ग्रंथालयाचे सुयोग्य व्यवस्थापन करण्यासाठी वेगवेगळयावेळी, वेगवेगळया पातळीवर निर्णय प्रक्रिया आवश्यक असते. त्याचप्रमाणे ग्रंथालयातील विविध कामे अधिक चांगल्यारितीने पार पाडण्यासाठी व्यवस्थापनातील नियोजन या कार्याचा उपयोग करावा लागतो. अशा या नियोजनात ग्रंथालयाचे चहूबाजूने विश्लेषणात्मक परीक्षण करणे अत्यंत महत्वपूर्ण मानले जाते आणि हे परीक्षण स्वॉट विश्लेषण पध्दतीद्वारे यशस्वीरित्या पार पाडून ग्रंथालय विकासास हातभार लावणारे धोरणात्मक निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी केली जाते. अशा या स्वॉट विश्लेषण पध्दतीद्वारे ग्रंथालय व्यवस्थापनात ग्रंथालयातील अंतर्भूत ताकद आणि उपलब्ध असणारी संधी (SO), अंतर्भूत ताकद व त्यास असणारे धोके (ST), ग्रंथालयांतील दुर्बलस्थानांवर मात करण्यासाठी असणारी उपलब्ध संधी (WO), तसेच ग्रंथालयाच्या दुर्बलस्थांनांमुळे ग्रंथालयाला असणारे धोके (WT), या व्यूहात्मक नियोजनाचा परामर्श मांडव्याचा प्रयत्न प्रस्तूत लेखात करण्यात आला आहे.

(की–वर्डः– ग्रंथालय, व्यवस्थापन, स्वॉट विश्लेषण, व्यूहात्मक नियोजन)

## प्रस्तावना

ग्रंथालय ही एक सेवाभावी व सामाजिक संस्था आहे. व्यक्तींचा सर्वांगीण विकास साधण्याचे सामर्थ्य ग्रंथालयात आहे. तसेच, ही एक वर्धिष्णू संस्था आहे. त्यामुळे त्यांचा वापर आणि विस्तार वेगाने होत आहे. याच कारणास्तव ग्रंथालयात देखिल विकासाच्या दृष्टिने आमूलाग्र बदल करणे अनिवार्य बाब ठरली आहे.

कोणत्याही क्षेत्रात एखाद्या संस्थेला प्रगती पथावर नेणारी एकमेव कार्यान्वित यंत्रणा म्हणजे 'व्यवस्थापन' होय. ग्रंथालयात देखिल व्यवस्थापन हे महत्त्वाची भूमिका बजावताना दिसते. याच व्यवस्थापनातील नियोजनात 'स्वॉट विश्लेषण' हे महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. या विश्लेषणाद्वारे ग्रंथालयाची अंतर्गत ताकद (Strengths), कमकुवत बाजू (Weakness), ग्रंथालय विकासास उपलब्ध असणारी संधी (Opportunities), आणि धोक्याच्या बाबी (Threats). यांचे


A Four-monthly Journal By
Vishwashanti Multipurpose Society,
(Global Peace Multipurpose Society)

विश्लेषणात्मक परीक्षण करून ग्रंथालयासंदर्भातील ध्येय धोरणे ठरविल्यास ग्रंथालयाच्या विकासास महत्वपूर्ण दिशा मिळते.

प्रस्तूत लेखात स्वॉट विश्लेषण पध्दतीद्वारे ग्रंथालयासंदर्भात आवश्यक असणाऱ्या महत्त्वपूर्ण बाबी, आखण्यात येणारी व्यूहरचना आणि संभाव्य परिस्थितीचा अंदाज घेऊन SO, ST, WO, WT या चारही व्यूह मधून कोणता व्यूह स्विकारावा याचा आढावा घेण्यात आला आहे.

## स्वॉट विश्लेषण

व्यवस्थापकीय नियोजन यशस्वी व्हावे याकरिता स्वॉट (SWOT) या नावाची विश्लेषण पध्दती विकसित करण्यात आली आहे.

**SWOT संज्ञा**

**S** - Strength
**W** - Weaknesses
**O** - Opportunities
**T** - Threats

या पध्दतीत संस्थेची अंतर्गत ताकद (Strength), अंतर्भूत दोष (Weaknesses), विकासास उपलब्ध संधी (Opportunity) आणि धोक्याच्या बाबी (Threats), या चार बाबींचा इंग्रजी नावांच्या आद्यक्षरांनी मिळून SWOT ही पध्दती बनली आहे.


SWOT विश्लेषण तंत्राद्वारे बाह्य–अंतर्गत परिस्थिती



वरील चौकटीचे निरीक्षण करता एका बाजूस अंतर्गत परिस्थिती स्थापित करून तिची ताकद व अंतर्भूत उणिवा असे दोन भाग दाखविले जातात तर चौकटीच्या दुसऱ्या बाजूस बाहय परिस्थितीतील उपलब्धी संधी आणि संभाव्य धोका असे दोन भाग दर्शवून ही चौकट मांडली जाते.

## ग्रंथालयात स्वॉट विश्लेषणाद्वारे व्यवस्थापन

ग्रंथालयात स्वॉट विश्लेषण पध्दती अवलंबताना ग्रंथालयातील सर्व बाबींचे पुढील चारही घटकात विभागणी योग्य पध्दतीने दर्शविता येते.




SWOT विश्लेषण तंत्र

❋अंतर्गत ताकद (Strength):–

कोणतेही ग्रंथालय हे त्या संस्थेचा केंद्रबिंदू मानला जातो. त्यामुळे ग्रंथालयात असणारी आधुनिक माहिती सेवा, प्रशिक्षित कर्मचारी वर्ग, व्यवस्थापनाचा योग्य पाठींबा, कार्यक्षम सेवा, वाचकांना प्रशिक्षण, अद्ययावत माहितीसाधने व यंत्रसामुग्री, माहितीचे प्रसारण इत्यादी बाबी ग्रंथालयाची ताकद ठरू शकते.

- **अंतर्गत उणिवा (Weaknesses):–**

ग्रंथपाल हे अनुभवी आणि कार्यतत्पर असावे त्यांच्या ग्रंथालयातल्या कमतरतेबाबत देखिल ते जागृत असावे. उदाहरणार्थ, अप्रशिक्षित कर्मचारी, आर्थिक पाठबळाची कमतरता, येणाऱ्या वाचनसाहित्यामधील अनियमितपणा, जागेची तसेच साधनांची कमतरता, व्यवस्थापनाचा ग्रंथालयाबाबत असणारा मतभेद इत्यादी उणिवेवर उपाय शोधून योग्य ते नियोजन अत्यंत आवश्यक असते.

- **उपलब्ध संधी (Opportunity):–**

सध्याच्या स्पर्धात्मक युगात समाजातील सर्व स्तरातील संस्था विकासासाठी प्रयत्नशील असतात. अशा या संस्थासाठी बाहयपरिस्थितीत अनेक संधी उपलब्ध असतात. ग्रंथालयांसांठी देखिल अशा लाभदायक, अनुकूल संधी उपलब्ध असतात. उदाहरणार्थ, शासकीय योजना, वाचक संख्या वाढविण्यासाठी बहिःशाल योजना राबविणे, ग्रंथालय प्रचार, इत्यादी, योजना, उपक्रम राबवून बाहयपरिस्थितीत उपलब्ध असणाऱ्या संधीचा जास्तीत जास्त वापर ग्रंथपालांना ग्रंथालय विकासासाठी करता येईल.

- **संभाव्य धोके (Threats):–**

ग्रंथालयासंदर्भात असणारे प्रतिकूल घटक हे ग्रंथालयासाठी संभाव्य धोके असतात. यांवर योग्यवेळी योग्य ती उपाययोजना केली नाही तर हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामध्ये ग्रंथालयीन कामकाजात असणारी अपारदर्शकता, वाचनसाहित्याचे किड, वाळवी, आग, पाणी इत्यादी पासुन संरक्षण करणे, विद्यापीठाचे बदलते धोरण, प्रतिकूल आर्थिक धोरण, इत्यादी घटक ग्रंथालयासाठी संभाव्य धोके ठरू शकतात.

अशा प्रकारे, स्वॉट विश्लेषणाद्वारे ग्रंथालयातील ताकद, उणिवा, उपलब्ध संधी आणि संभाव्य धोके याचा अंदाज ग्रंथपालांच्या निदर्शनास येऊन त्यांनी योग्य ते नियोजन केल्यास ग्रंथालयाच्या व्यवस्थापनास उत्तम अशी विकासात्मक दिशा प्राप्त होते.

## ग्रंथालयात स्वॉट विश्लेषणाद्वारे व्यूहरचना

ग्रंथालयात स्वॉट विश्लेषण पध्दतीचा अवलंब करताना ग्रंथालयातील परिपोषणात्मक बाबी म्हणजेच ग्रंथालयाची ताकद, दुर्बल स्थाने/उणिवा, उपलब्ध असणारी संधी आणि संभाव्य धोके या घटकांचे विभाजन करून योग्य ते नियोजन आखून उपाययोजना केल्यास ग्रंथालय उत्कृष्ट सेवा देण्यास सज्ज होऊ शकेल. परंतू या घटकांच्या नियोजन आणि उपाययोजनांसाठी स्वॉट विश्लेषणाद्वारे व्यूहरचना आखणे अत्यंत महत्त्वपूर्ण मानले जाते. ही रचना आखत असताना वेगवेगळया परिस्थितीत, वेगवेगळया वेळी, वेगवेगळे व्यूह स्विकारावे लागतात. त्यामध्ये SO, ST, WO, WT, अशी व्यूहरचना आपण वापरू शकतो याचे सविस्तर पुढील प्रमाणे.




- **ताकद – उपलब्ध संधी व्यूहरचना (SO)**

  (Strength – Opportunity Strategy):–

ग्रंथालया अंतर्गत असणारी ताकद म्हणजेच अनुकूल व्यवस्थापन, प्रशिक्षित कर्मचारी, अद्ययावत यंत्रसामुग्री, कामाचा उत्कृष्ठ दर्जा, आर्थिक पाठबळ इत्यादी बाबी होय आणि या बाबी अधिक उत्तोमत्तोम देण्यासाठी ग्रंथालयाने नेहमी प्रयत्नशील असावे. याकरिता बाहय परिस्थितीत असणारी संधी यांचा शोध ग्रंथालयाने सतत होणे अपेक्षित आहे. सध्याच्या माहितीयुगात माहितीचा होणारा विस्फोट लक्षात घेता, ती अधिक जलद आणि सुलभरितीने कशी देता येईल यावर लक्ष केंद्रित करून आधुनिक आणि अद्ययावत तंत्राचा वापर ग्रंथालयाकडून केला जावा. यामुळे ग्रंथालयातील परिपोषणात्मक बाबी अधिक बळकट होतील हे सत्य नाकारता येत नाही.

- **ताकद – संभाव्य धोके (ST)**

  (Strength – Threat Strategy):–

ग्रंथालयाच्या बलस्थानी असणारे घटक जसे SO या व्यूहरचनेमध्ये अधिक बळकट करता येतात त्याप्रमाणे त्या घटकांना अनेक बाह्य परिस्थितीतील घटकांपासून धोके निर्माण होऊ शकतात याकरिता ग्रंथालयाने नेहमी सतर्क राहणे गरजेचे असते. उदाहरणार्थ, वाचनसाहित्याचे किड, वाळवी, आग, पाणी यांपासून संरक्षण करणे, वाचनसाहित्याचा विमा उतरविणे, ग्रंथालयाचा दर्जा खालविण्यापासून सतत सतर्क राहणे, ग्रंथालयीन कामकाजात पारदर्शकता कायम ठेवणे इत्यादी बाबींचे वेळोवेळी नियोजन केल्यास ग्रंथालयातील अंतर्गत ताकदीला बाहपरिस्थितीतून उद्‌भवणाऱ्या धोक्यांपासून संरक्षण देता येईल.

- **उणिवा – उपलब्ध संधी (WO)**

  (Weakness – Opportunity Strategy):–

ग्रंथालयांसंदर्भात असणाऱ्या कमकुवत बाजू जाणून घेऊन उपलब्ध संधीद्वारे त्यावर योग्य त्या उपाययोजना करून त्या बाजू बळकट बनविण्यासाठी ती व्यूहरचना अत्यंत उपयुक्त ठरू शकते. उदाहरणार्थ, अप्रषिक्षित कर्मचाऱ्यांना ग्रंथपालन प्रशिक्षण देऊन प्रषिक्षित करणे, आंतरग्रंथालयीन देवाण–घेवाणद्वारे वाचनसाहित्य तसेच साधनांची वाचकांना पूर्तता करून त्याबाबत असणारी कमतरता दूर करणे. सहकार योजनेद्वारे विविध उपक्रम राबविणे, विविध शासनाच्या योजनाचा लाभ मिळवण्यासाठी सतत प्रयत्नशील राहणे. अशाप्रकारे बाहयपरिस्थितीतील उपलब्ध असणाऱ्या संधीद्वारे ग्रंथालयातील उणिवा दूर करण्यात कायदेशीर ठरू शकते.

- **उणिवा – संभाव्य धोके (WT)**

  (Weakness – Threat Strategy):–

ग्रंथालयाच्या असणाऱ्या कमकुवत बाजू ग्रंथपालाने जाणून त्यापासून असणारे धोके यांचा संभाव्य अंदाज या व्यूहरचनेत मांडता येतो. आणि ते संभाव्य धोके लक्षात घेऊन योग्य वेळी ग्रंथालयातील उणिवांवर योग्य त्या उपाययोजना आखण्यास ग्रंथपालास मदत होते.

अशाप्रकारे, ग्रंथालयांचा सर्वांग अभ्यास करून योग्य ती उपाययोजना तसेच, विकासात्मक बाब घडविण्यात 'स्वॉट विश्लेषण' हे व्यवस्थापनातील नियोजनामधील अत्यंत महत्त्वपूर्ण तंत्र मानले जाते.

## निष्कर्ष .

अशा प्रकारे प्रस्तूत लेखाचा आशय पाहता, स्वॉट विश्लेषण तंत्राद्वारे ग्रंथालयातील अंतर्गत परिस्थितीत असणारी ताकद (Strength) आणि उणिवा (Weaknesses) तसेच, बाहय परिस्थितीतील उपलब्ध संधी (Opportunity) आणि धोक्याच्या बाबी (Threats) याद्वारे व्यूहात्मक नियोजनाची अंमलबजावणी केल्यास ग्रंथपालाला स्वतःची योग्य अशी ओळख होते आणि कोणत्याही कारणाने यश अथवा अपयश आले तरी त्याची नीट संगती लावून त्यावर सुयोग्य ती उपाययोजना करणे शक्य होते.

## संदर्भ सूची

- गणपुले, श.रा. : व्यवस्थापन मूलतत्त्वे, कार्यपध्दती आणि मूल्यमापन, यषवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, 2011.

- थोरात, लक्ष्मण : ग्रंथालय माहितीशास्त्र, डायमंड पब्लिकेशन, पुणे, 2007.
- नरगुंदे, रेवती : ग्रंथालये आणि सामाजिक विकास, युनिव्हर्सल प्रकाशन, पुणे.
- निकोसे, सत्यप्रकाश : आधुनिक ग्रंथालयाचे व्यवस्थापन, नागपूर, प्रजा प्रकाषन, 2007.
- पवार, शंकर पा. : ग्रंथालय आणि माहितीशास्त्र, कडके प्रकाशन, कोल्हापूर, 2009.
- पवार, एस. एस.: यु.जी.सी. ॲन्ड डेव्हलपमेंट ऑफ लायब्ररी, दिप पब्लिकेषन, न्यु दिल्ली, 1948.
- पारखी, गंगाधर. र. : ग्रंथालयशास्त्र परिचय, युनिव्हर्सल प्रकाशन, पुणे, 2001.
- पलोटी, रमेश ग. : भवन्स महाविद्यालयाचे स्वॉट विश्लेषण, ही लिखित स्वरूपाची तयारीत माहिती.
- बुवा, जी. ए. : ग्रंथालय आणि माहितीशास्त्र व्यवस्थापनाचे नवे प्रवाह, श्री. साई प्रकाशन, सावंतवाडी, 2007.
- भागवत, शशिकला. गं : ग्रंथालय व्यवस्थापन, युनिव्हर्सल प्रकाषन, पुणे, 2003.
- महाजन, शांताराम गजानन : ग्रंथालय व्यवस्थापन, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे, 2009.
- म्हापसेकर, वासुदेव : संदर्भसेवा : ग्रंथालयाकडून इंटरनेटकडे, वर्षा इन्फोटेक, मुंबई, 2008.
- लोटलीकर, शरद : ग्रंथालय व्यवस्था, लोटलीकर प्रकाशन, मुंबई, 1991.
- शेटये, हेमंत श्रीकांत : ग्रंथालय संघटन, सोमनाथ पाटील प्रकाशन, मुंबई, 2003.
- सुतार, धनंजय भगवान : ग्रंथालय आणि माहितीशास्त्र, ए.बी.एस. पब्लिकेशन, वाराणसी, 2011.
- ज्ञानगंगोत्री, अंक 2 – सप्टें. – ऑक्टो. – नोव्हें. 2010.